The Muslim Co-op. Bank Ltd. Pune.
Administrative Office, Pune-42
INWARD No.ADM. 2058
Date 3/11/21 Entd.by.
Recd.by.

रासनिप्रा

महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
**जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,पुणे शहर,पुणे**
**यांचे कार्यालय,साखर संकुल**,तळ मजला **शिवाजीनगर पुणे**-४११०
दुरध्वनी क्र.०२०-२९५२२३१८ ई-मेल-ddrpunecity@gmail.com

जा.क्र.जिउनिपुश/निवडणूक/ ब वर्ग/अंतिम मतदार यादी/सन२०२१/ 13812 दिनांक : - ०१/ ११/२०२१

**( महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम,२०१४ अन्वये अर्ज)**

**वाचले :-**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४
२) **दि मुस्लिम को ऑप बँक लि.६४७,भवानी पेठ,पुणे-४११०४२** यांची मंजुर उपविधी
३) या कार्यालयाकडील दि.२८/१०/२०२१ रोजीचे हरकती/आक्षेपवरील आदेश.
४) **मुख्य कार्यकारी अधिकारी, दि मुस्लिम को-ऑप बँक लि. ६४७,भवानी पेठ,पुणे-४११०४२** दि.२१/०१/२०२० यांचेकडील दि.०१/११/२०२१ रोजीची अर्ज.

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, **दि मुस्लिम को ऑप बँक लि.६४७,भवानी पेठ,पुणे-४११०४२** ( या पुढे उल्लेख सदर सहकारी बँक असा करण्यात आलेला आहे.) या सहकारी बँकेची संचालक मंडळ निवडणूकीची प्रकीया सुरु असुन पतसंस्थेची प्रारुप मतदार यादी दि.०८/१०/२०२१ ते १८/१०/२०२१ पर्यंत प्रसिध्द करण्यात येऊन,प्रारुप मतदार यादीबाबत हरकती/आक्षेप मागविण्यात आलेले होते.आणि,

ज्या अर्थी, सदर वाचले क्र.३ चे अनुषंगाने **दि मुस्लिम को ऑप बँक लि.६४७,भवानी पेठ, पुणे-४११०४२ परिशिष्ट अ** मध्ये नमुद **एकूण १३** सभासदांनी त्यांची थकबाकीची रक्कम दि.१८/१०/२०२१ पर्यंत भरलेली असल्याने त्याचे नाव मतदार यादीमध्ये समाविष्ट करणेबाबतचे त्यांनी दाखल केलेल्या हरकत/आक्षेप च्या अनुषंगाने त्यांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करणेबाबत. तसेच ५ सभासदांनी त्यांचे नाव/ पत्ता यामध्ये दुरुस्ती करणेबाबतचे दाखल केलेली हरकती/आक्षेप निकाली काढुन त्यांची नावे / पत्ता यामध्ये दुरुस्ती करणेबाबतचे आदेश दि.२८/१०/२०२१ रोजीच्या दिलेले आहे.

त्याअर्थी, दि मुस्लिम को ऑप बँकेनी दि.०१/११/२०२१ रोजीच्या अर्जान्वये या कार्यालयाकडील दि.२८/१०/२०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने ५ सभासदांच्या नाव /पत्ता यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच **परिशिष्ट अ** मध्ये दाखल पुरवणी मतदार यादीतील एकुण १३ सभासदांची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करुन अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे उचित होईल. असे माझे मत झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील क्र.८(३) अन्वये प्राप्त अधिकारास अनुसरुन मी,**एन.व्ही. आघाव**,जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी ,पुणे शहर,पुणे तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,पुणे शहर असा आदेश देतो की, या कार्यालयाकडील दि.२८/१०/२०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने वाचले क्र.४ अन्वये ५ सभासदांच्या नाव /पत्ता यामध्ये योग्य ती दुरुस्ती **परिशिष्ट अ** मध्ये दाखल पुरवणी मतदार यादीतील **एकूण १३** सभासदांची नावे समाविष्ट करण्यात आलेली मतदार यादी **दि मुस्लिम को ऑप बँक लि.६४७,भवानी पेठ,पुणे-४११०४२** या संस्थेच्या संचालक मंडळ निवडणूकीच्या अनुषंगाने बँकेने दाखल केलेली मतदार यादी संचालक मंडळ निवडणूकीची अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

3/11/21

सदरचा आदेश आज दि.०१/११/२०२१ रोजी माझ्या सही व कार्यालयीन शिक्कयासह दिला असे.

दिनांक :- ०१/११/२०२१

**( एन. व्ही. आघाव )**

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी पुणे शहर तथा

**प्रत -**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, **दि मुस्लिम को ऑप बँक लि.६४७,भवानी पेठ,पुणे-४११०४२**
२. निवडणूक निर्णय अधिकारी, **दि मुस्लिम को ऑप बँक लि.६४७,भवानी पेठ,पुणे-४११०४२**
३. उपनिबंधक,सहकारी संस्था,पुणे शहर-२

**प्रत माहितीस्तव सविनय सादर —**

मा.सचिव,राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,पुणे

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,पुणे शहर,तथा
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,पुणे शहर